महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. ०१९ २२२१८०० Website : www.mahaawaas.org
Email ID : directoriayruralhousing@gmail.com Maha Awaas :

क्र. राव्यक-ग्रागृ/IT/१६५६/२०२५ दि.१७/०७/२०२५

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय : प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटुंबाचे सर्वेक्षणाबाबत (Awaas+ २०२४ Survey).**

संदर्भ : मा. संचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. F.No.M-१२०१६/३/२०२५- RH-Pol .(e-३९१५२१), दि.१७ जुलै,२०२५.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, **मा. संचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी Awaas+ २०२४ चे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी दि. ३१ जुलै, २०२५ पर्यंतची अंतिम मुदतवाढ दिलेली आहे.**
यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. आपल्या जिल्ह्यातील आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मधील प्रतिक्षा यादीत (Priority List) समाविष्ट न झालेले व सिस्टीमद्वारे अपात्र झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले सर्व कुटुंबांचे (Potentially eligible households under PMAY-G) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत नवीन १० Exclusion Criteria नुसार **दि.३१ जुलै, २०२५ पर्यंत** सर्वेक्षण पूर्ण करुन कोणतेही बेघर कुटुंब या सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
२. ज्या ग्रामपंचायतीमध्ये सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, अशा सर्व ग्रामपंचायतींना आवास सॉफ्ट प्रणालीवर "सर्वेक्षण पूर्ण" (Survey Completed) झाल्याचे **दि. ३१ जुलै, २०२५ पर्यंत** चिन्हांकित (Mark) करण्यात यावे.
३. जिल्ह्यातील १००% स्वयं-सर्वेक्षण (Self-Survey) प्रकरणांचे सर्वेक्षकांद्वारे पुष्टीकरण (Corroboration) करण्याची कार्यवाही **दि. ३१ जुलै, २०२५ पर्यंत** पूर्ण करण्यात यावी.
४. Self व Assisted Survey द्वारे ज्या कुटुंबांना सिस्टीमद्वारे Flagged केले आहे, अशा कुटुंबांचे Checker द्वारे Verification करण्याची कार्यवाही **दि.३१ जुलै, २०२५ पर्यंत** पूर्ण करण्यात यावी.
५. **या पुढे सर्वेक्षणासाठी कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.**

तरी उपरोक्त बाबत विहीत वेळेत कार्यवाही पूर्ण करण्याची विनंती आहे.

**सोबत** : संदर्भिय पत्र.

**(डॉ. राजाराम दिघे)**
**संचालक, ग्रामीण गृहनिर्माण.**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत** : १) मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) मा.विभागीय आयुक्त , विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३) अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.